डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त दि.१७ एप्रिल ते २० एप्रिल २०१६ या कालावधीत राज्यातील सर्व ग्रामपंचायती व ग्रामसभेत " ग्राम किसान सभा अभियान " राबविणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२९/३अे**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ७ एप्रिल, २०१६

**संदर्भ :** १) सचिव, पंचायत राज मंत्रालय व सचिव, सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्रालय, नवी दिल्ली यांचे अर्ध शासकीय पत्र क्र. १९०२२/७/२०११-एससीडी-सहा, दि.२३.३.२०१६ व अर्ध शासकीय पत्र क्र. जे-११०११/४०/२०१६-मीडीया, दि.२८.३.२०१६

२) शासन पत्र सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. सान्यावि २०१५/प्र.क्र.१६३ (४)/ बांधकामे, दिनांक २९.३.२०१६

३) संचालक ( विस्तार व प्रशिक्षण ) यांचे पत्र क्र.कृमावि/ग्रा.कि.स/२२७/२०१६, दि.३१.३.२०१६ व पत्रं क्र.कृमावि/ग्रा.कि.स/२३९/२०१६, दि.२.४.२०१६

४) ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्र.बैठक २०१६/ प्र.क्र.११७/पं.रा.-३, दि.७.४.२०१६

५) शासन पत्र क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२९/३अे, दि.१.४.२०१६ व शासन पत्र क्र. संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.३०/३अे, दि.६.४.२०१६

**शासन परिपत्रक :-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त दि. १४ ते २४ एप्रिल,२०१६ या कालावधीत "ग्राम उदय से भारत उदय" अभियान देशातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये राबविण्याबाबत केंद्र शासनाने दिलेल्या सूचनांनुसार. सदर अभियानांतर्गत कृषि विभागाअंतर्गत राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये दि.१७ ते २० एप्रिल,२०१६ या कालावधीत **" ग्राम किसान सभा अभियान "** सर्व ग्रामपंचायतीत राबवायचे आहे. यासंदर्भात, सचिव, पंचायत राज मंत्रालय व सचिव, सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अर्ध शासकीय पत्र दि.२३.३.२०१६ मधील सूचनांनुसार कृषि विभागाअंतर्गत सदर अभियान राबविण्यासंदर्भात संचालक ( विस्तार व प्रशिक्षण ) यांच्या पत्र दि.३१.३.२०१६ व दि.२.४.२०१६ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

**२. त्याव्यतिरिक्त, दि.१७ ते २० एप्रिल,२०१६ या कालावधीत " ग्राम किसान सभा अभियान " राज्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये राबविण्यासंदर्भात खालील सूचना देण्यात येत आहेत.**

१) आयुक्त ( कृषि ) यांनी राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये आयोजित करावयाच्या ग्राम किसान सभेमध्ये प्राथम्यक्रमाने मृद आरोग्य सुधारणा, मृद आरोग्य कार्डचे महत्त्व, पाण्याचा कार्यक्षम वापर, शेत जमीन पोतास अनुरूप पीकांचे नियोजन करण्याची गरज, नैसर्गिक साधनसंपत्तीची उपलब्धता, कृषि पीक विमा योजना तसेच पाण्याचा कार्यक्षम वापराबाबत राज्याचे प्राथम्य, शेत तळी, सेंद्रीय शेती जागरूकता, फळबागांविषयीच्या योजना इत्यादि विषयावरील माहिती तसेच यासंदर्भात सचिव, पंचायत राज मंत्रालय व सचिव, सामाजिक न्याय व सबलीकरण

मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अर्ध शासकीय पत्र दि.२८.३.२०१६ मधील सूचना विचारात घेवुन शेतकऱ्यांना द्यावयाची माहिती सुनिश्चित करावी तसेच आवश्यक वाचन साहित्य व राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती पुस्तिका जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावी.

२) वरील १) अनुसार कृषि आयुक्तालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीसोबत संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व प्रकल्प संचालक (आत्मा) यांनी त्यांच्या जिल्हयांतील शेती विषयक अडचणी / समस्या व त्यावरील उपाययोजना, एखादया जिल्हयातील/ क्षेत्रातील भविष्यातील वैशिष्टपूर्ण बाबी, पाण्याचे अर्थ नियोजन इत्यादि विषयावर शेतकऱ्यांना दयावायाची माहिती सुनिश्चित करावी. व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी तयार केलेली माहिती पुस्तिका मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे तात्काळ उपलब्ध करून दयावी.

३) संचालक ( विस्तार व प्रशिक्षण) यांनी सदरहू ग्राम किसान सभा अभियानाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी कृषि विभागाचे लेख महान्यूजवर टाकण्याकरिता महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना उपलब्ध करुन दयावेत. तसेच दिलखुलास व जय महाराष्ट्र या दूरदर्शनवरील प्रक्षेपित होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये मंत्री महोदय यांची चर्चा घडवून आणण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी व आकाशवाणी व सार्वजनिक आरोग्य विभागाकडील रेडियोवरील उपलब्ध स्लॉटचा वापर करावा.

४) प्रकल्प संचालक ( आत्मा ) यांनी वरील १) व २) अनुसार सुनिश्चित व तयार करण्यात आलेल्या माहितीच्या आधारे त्यांच्या जिल्हयासाठी व त्यांच्या जिल्हयाला उपयोगी / relevant एक माहितीपत्रक (Brochure) तयार करावे. व जिल्हयातील ग्रामपंचायतीसाठी प्रत्येकी कमीत कमी २ प्रती गृहीत धराव्यात व कृषि पर्यवेक्षक, मंडल कृषि अधिकारी, तंत्र अधिकारी, उप विभागीय कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या वापरासाठी माहितीपत्रकाच्या आवश्यक तेवढया प्रती छापून दि.१७ एप्रिल, २०१६ पूर्वी त्या सर्व संबंधिताना तात्काळ पुरविण्याची व्यवस्था करावी.

५) कृषि सहायकांनी दि.१७- २० एप्रिल,२०१६ या कालावधीत त्यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायतींना ग्राम किसान सभेच्या आयोजनाबाबत पूर्वसूचना दयावी. व या कार्यक्रमात जास्तीत जास्त शेतकरी, शेतमजूर , शेतकरी महिला सहभागी होतील याबाबत आवश्यक ती उपाययोजना करावी. तसेच प्रकल्प संचालक (आत्मा) यांचेमार्फत त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीपत्रकाच्या प्रत्येकी २ प्रती प्रत्येक ग्रामपंचायतींस ग्राम किसान सभेपूर्वी दयाव्यात. आणि सदर माहितीपत्रकातील माहितीच्या आधारे कृषि सहायकांनी कृषि पर्यवेक्षक, मंडल कृषि अधिकारी यांच्या पर्यवेक्षण व मार्गदर्शनानुसार ग्राम किसान सभेत शेतकऱ्यांना माहिती दयावी. व कृषि विकासासाठी शेतकऱ्यांकडून सूचना मागविण्यात याव्यात. व शेतकऱ्यांकडून प्राप्त होणाऱ्या सूचना संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेमार्फत आयुक्त ( कृषि ) यांना सादर कराव्यात.

६) सर्व मंडल कृषि अधिकारी, तंत्र अधिकारी, उप विभागीय कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी दि.१७ - २० एप्रिल, २०१६ या कालावधीत राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या किमान प्रत्येकी ५ ग्राम किसान सभांना व्यक्तीशः उपस्थित राहून सदर सभांचे पर्यवेक्षण करावे.

(७) वरीलप्रमाणे राज्यातील ग्राम किसान सभा अभियान कार्यक्रम राबविण्यात यावा. सदर कार्यक्रमासाठी अतिरिक्त निधी पुरविण्यात येणार नाही. सदर कार्यक्रम आत्मा योजनेअंतर्गत मंजूर घटकांतून करण्याची व्यवस्था करावी व त्यासाठी प्रत्येक जिल्हयाकरिता कमाल रु.५०,०००/- पर्यंत कमीत कमी खर्च होईल याची दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०४१११११४०१४७१०१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vikram Nivrutti Dhamal

Digitally signed by Vikram Nivrutti Dhamal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=10d36944a4b86eab516b1b70183709c5fb570cfdf5a52755adfef51ed380b836, cn=Vikram Nivrutti Dhamal
Date: 2016.04.11 11:44:10 +05'30'

(विक्रम ढमाळ)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) आयुक्त,( कृषि ) कृषि आयुंक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२) संचालक, ( विस्तार व प्रशिक्षण ) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) संचालक, ( आत्मा ) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत-**

१) मा. मंत्री ( कृषि ) व मा. राज्यमंत्री ( कृषि ) यांचे खाजगी सचिव,
२) अपर मुख्य सचिव ( कृषि ) यांचे स्वीय सहायक
३) प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४) सचिव, जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई,
६) सर्व संचालक / सर्व सह संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
७) महालेखापाल, महाराष्ट्र-१ ( लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा ).मुंबई
८) महालेखापाल, महाराष्ट्र-२ ( लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा ),नागपूर,
९) उप सचिव, सामाजिक न्याय विभाग / कार्या.बांधकामे, मंत्रालय, मुंबई-३२
१०) उप सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-१
११) सर्व विभागीय कृषि सह संचालक,
१२) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
१३) सर्व प्रकल्प संचालक ( आत्मा )
१४) सर्व जिल्हयांचे कोषगार अधिकारी
१५) नियोजन विभाग ( कार्यासन १४३१) मंत्रालय, मुंबई,
१६) वित्त विभाग, ( कार्यासन व्यय-१/अर्थसंकल्प-३, अर्थसंकल्प-१२) मंत्रालय, मुंबई,
१७) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ मधील सर्व कार्यासने
१८) निवड नस्ती / ३ अे कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

* * *